सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९७१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३**

# महाराष्ट्र राष्ट्रीय व राज्य उपवने अधिनियम, १९७०

( दिनांक १३ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित )

**MAHARASHTRA ACT No. XXIII OF 1971**

# THE MAHARASHTRA NATIONAL AND STATE PARKS ACT, 1970

( As modified upto 13th November, 2006 )

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, पुणे, यांनी मुद्रित केले व संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई - ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२००६

[किंमत रु. ६/-]

# महाराष्ट्र राष्ट्रीय व राज्य उपवने अधिनियम, १९७०

## अनुक्रमणिका


| | | पृष्ठे |
|---|---|---|
| उद्देशिका | .. | |
| कलमे | | |
| १. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | .. | १ |
| २. व्याख्या. | .. | १ |
| ३. संचालक व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांची नेमणूक. | .. | २ |
| ४. महाराष्ट्र राष्ट्रीय व राज्य उपवने सल्लागार समितीची स्थापना. | .. | २ |
| ५. सल्लागार समितीची कर्तव्ये. | .. | ३ |
| ६. सल्लागार समितीची कार्यपद्धती. | .. | ३ |
| ७. कोणतेही क्षेत्र राष्ट्रीय किंवा राज्य उपवन म्हणून जाहीर करणाऱ्या निर्णयाबाबतची अधिसूचना. | .. | ३ |
| ८. कलम ७ अन्वये अधिसूचित केलेल्या क्षेत्रात हक्क उपार्जित होण्यास प्रतिबंध. | .. | ४ |
| ९. सक्षम प्राधिकाऱ्याने उद्घोषणा करणे. | .. | ४ |
| १०. सक्षम प्राधिकाऱ्याकडून चौकशी. | .. | ४ |
| ११. सक्षम प्राधिकाऱ्याचे अधिकार. | .. | ४ |
| १२. हक्क नष्ट होणे. | .. | ५ |
| १३. ज्या जमिनीवर हक्क सांगण्यात आला असेल ती जमीन संपादन करण्याचा अधिकार. | .. | ५ |
| १४. राष्ट्रीय किंवा राज्य उपवने स्थापित करण्याची अधिसूचना. | .. | ५ |
| १५. एखादे क्षेत्र राष्ट्रीय किंवा राज्य उपवन म्हणून राहणार नाही असे घोषित करण्याचा अधिकार. | .. | ६ |
| १६. अधिनियमान्वये प्रस्थापित केलेल्या उपवनाचे नियंत्रण आणि संचालकाची कामे व कर्तव्ये. | .. | ६ |

पृष्ठे

कलमे


| | | |
|---|---|---|
| १७. | उपवनामध्ये प्रवेश करण्यावर किंवा तेथे निवास करण्यावर निर्बंध. .. | ६ |
| १८. | राष्ट्रीय किंवा राज्य उपवनामध्ये मनाई केलेली कृत्ये. .. | ७ |
| १९. | प्रवेश करण्याचा, झडती घेण्याचा आणि जप्ती करण्याचा अधिकार. .. | ७ |
| २०. | अधिपत्राशिवाय अटक करण्याचा अधिकार. .. | ८ |
| २१. | अपराध व शास्ती. .. | ८ |
| २२. | अधिनियमाखालील अपराध दखली असणे. .. | ८ |
| २३. | अपराधाची तडजोड करण्याचा अधिकार. .. | ८ |
| २४. | या अधिनियमान्वये अधिकार प्रदान केलेल्या व्यक्ती लोकसेवक असणे. .. | ९ |
| २५. | सद्‌भावनेने केलेल्या कृत्याचे संरक्षण. .. | ९ |
| २६. | नियम. .. | ९ |
| २७. | रद्द करणे व व्यावृत्ती. .. | ११ |
| २८. | इतर विवक्षित विधींच्या प्रवर्तनास प्रतिरोध नसणे. .. | ११ |
| २९. | राष्ट्रीय महत्त्वाची प्राचीन स्मारके, इत्यादींना अधिनियम लागू नसणे. .. | ११ |

## सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३[1]

[ महाराष्ट्र राष्ट्रीय व राज्य उपवने अधिनियम, १९७० ]

[ दिनांक ६ मे, १९७१ ]

**महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय उपवने व राज्य उपवने यासंबंधी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** विशिष्ट निसर्ग रचना, त्यातील वनस्पती व प्राणिसृष्टीच्या हिताच्या दृष्टीने, महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय व राज्य उपवनांची स्थापना, त्यांचे परिरक्षण, व्यवस्थापन व विकास यासाठी व त्यांचा जनतेने आस्वाद घ्यावा म्हणून त्यांस उत्तेजन देणे व या गोष्टीचे नियमन करणे यासाठी व उपरिनिर्दिष्ट प्रयोजनांशी संबंधित असलेल्या इतर बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकविसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राष्ट्रीय व राज्य उपवने अधिनियम, १९७० असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील अशा दिनांकास,[2] अंमलात येईल.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,— व्याख्या.

(क) ''सल्लागार समिती'' याचा अर्थ, कलम ४ अन्वये प्रस्थापित केलेली सल्लागार समिती असा आहे;

(ख) ''प्राणी'' या संज्ञेत, कोणताही सस्तन प्राणी, पक्षी, सरपटणारा प्राणी, भू-जलचर, मासा व कीटक किंवा इतर अपृष्ठवंशी यांचा अंतर्भाव आहे;

(ग) ''उप-विधि'' याचा अर्थ, कलम ६ अन्वये तयार करण्यात आलेले उपविधि असा आहे;

(घ) ''सक्षम प्राधिकारी'' याचा अर्थ, कलम ७ अन्वये सक्षम प्राधिकारी म्हणून राज्य शासनाने नियुक्त केलेला अधिकारी असा आहे;

(ङ) ''संचालक'' याचा अर्थ, कलम ३ अन्वये, राज्य शासनाने, संचालक, राष्ट्रीय व राज्य उपवने, महाराष्ट्र राज्य म्हणून नियुक्त केलेला अधिकारी असा आहे;

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता महाराष्ट्र शासन राजपत्र, १९७०, भाग-५ सर्वसाधारण, पृष्ठ २१६ पहा.

[2] १५ जून, १९७१ (जी.एन., आर आणि एफ.डी. क्रमांक पीजीएस-- १६७१ (४३९६६-दहा-दोन, दिनांक १० जून, १९७१ अन्वये).

(च) ''उपवन'' याचा अर्थ, या अधिनियान्वये रचना केलेले किंवा रचना केल्याचे समजण्यात येणारे राष्ट्रीय उपवन किंवा राज्य उपवन असा आहे;

(छ) ''उपवन अधिकारी'' याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी नियुक्त केलेला किंवा प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी असा आहे;

(ज) ''विहित'' याचा अर्थ, नियमाद्वारे विहित केलेले असा आहे;

(झ) ''नियम'' याचा अर्थ, कलम २६ अन्वये तयार केलेले नियम असा आहे;

(ञ) ''सापळा'' या संज्ञेत, ज्यायोगे एखादा प्राणी पकडता येईल किंवा त्याची हत्या करता येईल अशा कोणत्याही यंत्रकाचा किंवा साधनाचा समावेश होईल;

(ट) ''शस्त्र'' या संज्ञेत, कोणतेही दारुगोळा हत्यार किंवा त्यासाठीचा दारुगोळा, धनुष्यबाण, भाला याचा किंवा ज्यामुळे एखाद्या प्राण्याची हत्या करता येईल किंवा त्यास इजा करता येईल अशा रीतीने, एखाद्या अस्त्रास चालना देऊ शकेल किंवा ते चालवू शकेल किंवा वापरू शकेल असे कोणतेही इतर उपकरण किंवा साधन यांचा अंतर्भाव आहे.

संचालक व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांची नेमणूक.

३. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, राज्य शासनास, मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य याची किंवा राज्य शासनाच्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याची, संचालक म्हणून नेमणूक करता येईल. राज्य शासनास किंवा याबाबत त्यानी प्राधिकृत केलेला कोणत्याही अधिकाऱ्यास, शासनाकडून किंवा अशा अधिकाऱ्याकडून याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा पदनामासह व अशा स्थानिक क्षेत्रासाठी किंवा संपूर्ण राज्यासाठी आवश्यक वाटतील अशा इतर अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल.

(२) या अधिनियमाद्वारे किंवा तद्‌अन्वये आपल्या कर्तव्यांचे पालन करीत असताना व आपल्या अधिकारांचा वापर करीत असताना, संचालक, राज्य शासन वेळोवेळी देईल अशा सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांस अधीन राहील. इतर अधिकारी व कर्मचारी हे संचालकाचे अधीन असतील व अशा व्यक्तींची परस्परातील अधीनता राज्य शासनाकडून ठरविण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

महाराष्ट्र राष्ट्रीय व राज्य उपवने सल्लागार समितीची स्थापना.

४. (१) हा अधिनियम अंमलात आल्यावर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य शासन, ''महाराष्ट्र राष्ट्रीय व राज्य उपवने सल्लागार समिती'' या नावाने ओळखण्यात येणाऱ्या एका सल्लागार समितीची स्थापना करील व ती, **पदसिद्ध** अध्यक्ष या नात्याने, वनमंत्री, **पदसिद्ध** उपाध्यक्ष या नात्याने, वन राज्यमंत्री (कोणतेही असल्यास) व वन उपमंत्री (कोणतेही असल्यास), वन विभागातील शासनाचे सचिव, संचालक, अधीक्षक, उपवने व उद्याने म्हणून त्या त्या वेळी नेमण्यात आलेली व्यक्ती, व राज्य शासन याबाबतीत नामनिर्देशित करील असे दहा इतर सदस्य यांची मिळून होईल.

(२) राज्य शासनाने याबाबतीत पदनिर्देशित केलेला कोणताही उपवन अधिकारी सल्लागार समितीचा सचिव असेल.

(३) (पदसिद्ध सदस्यखेरीज करून इतर) सदस्य, सामान्यतः तीन वर्षांच्या मुदतीकरिता किंवा राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा त्याहून अल्प मुदतीकरिता पद धारण करतील :

परंतु, राज्य शासनाकडून कोणतेही कारण न दर्शविता, कोणत्याही वेळी, कोणत्याही सदस्याचा पदावधी, समाप्त केला जाऊ शकेल.

(४) बिनसरकारी सदस्य, आपल्या कर्तव्याचे पालन करताना योग्य रीतीने केलेल्या खर्चाच्या संबंधात, विहित करण्यात येतील असे भत्ते मिळण्यास हक्कदार असतील:

परंतु, राज्य विधानमंडळाच्या एखाद्या सदस्यास सल्लागार समितीचा सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात आले असेल तर, त्यास, प्रवास भत्ता, दैनिक भत्ता किंवा सल्लागार समितीच्या सदस्यास, समितीच्या सभेस हजर राहण्यात किंवा असा सदस्य म्हणून इतर कोणतीही कामे पार पाडण्यात आलेला व्यक्तिगत खर्च भागविण्याच्या कारणासाठी देण्यात येत असेल असा इतर भत्ता खेरीज करून इतर कोणतेही पारिश्रमिक मिळविण्यास हक्कदार नसतील.

सल्लागार समितीची कर्तव्ये.

५. राज्य शासनास पुढील बाबतीत सल्ला देणे हे, सल्लागार समितीचे कर्तव्य असेल:–

(क) राष्ट्रीय उपवने किंवा राज्य उपवने म्हणून जाहीर करावयाच्या क्षेत्रांची निवड करणे;

(ख) राष्ट्रीय व राज्य उपवनाच्या व्यवस्थापनात अनुसरावयाचे धोरण ठरविणे;

(ग) कलम २६ अन्वये नियम तयार करण्याच्या बाबींसंबंधात;

(घ) राज्य शासन तिच्याकडे विचारार्थ पाठवील अशी राष्ट्रीय व राज्य उपवनांशी संबंधित इतर कोणतीही बाब.

सल्लागार समितीची कार्यपद्धती.

६. (१) सल्लागार समितीची, मुंबई येथे किंवा राज्य शासन निर्देश देईल अशा इतर ठिकाणी, वर्षातून निदान एकदा बैठक होईल.

(२) कार्यपद्धती ही (यात गणपूर्तीचा समावेश होतो) याबाबत करण्यात आलेल्या उपविधिद्वारे सल्लागार समिती ठरवील अशी राहील.

कोणतेही क्षेत्र राष्ट्रीय किंवा राज्य उपवन म्हणून जाहीर करणाऱ्या निर्णयाबाबतची अधिसूचना.

७. (१) सल्लागार समितीच्या सल्ल्यावरून किंवा अन्यथा, राज्य शासनास कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत केव्हाही असे दिसून येईल की, तेथील फुले, प्राणी, देखावे किंवा इतर नैसर्गिक सौंदर्याच्या गोष्टीमुळे किंवा त्यांच्या शैक्षणिक, वैज्ञानिक, पुरातत्त्वीय, ऐतिहासिक किंवा भूविज्ञानविषयक साहचर्यामुळे किंवा महत्त्वामुळे, त्या क्षेत्राचे नैसर्गिक सौंदर्य किंवा महत्त्व कायम राखण्याच्या, त्याचे संरक्षण करण्याच्या, त्याचा विकास करण्याच्या किंवा ते वृद्धिंगत करण्याच्या प्रयोजनार्थ आणि तेथे नित्य जाणाऱ्या व्यक्तींना त्याचा उपभोग घेण्याकरिता सोई पुरविण्यासाठी उपाययोजना करणे इष्ट आहे तेव्हा, राज्य शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, असे क्षेत्र यथास्थिति, राष्ट्रीय उपवन किंवा राज्य उपवन म्हणून प्रस्थापित करण्याचे ठरविण्यात आलेले आहे असे जाहीर करता येईल.

(२) अधिसूचनेद्वारे–

(क) अशा क्षेत्राच्या जागेचे व हद्दीचे शक्य होईल तितके अचूक वर्णन करण्यात येईल ; आणि

(ख) सक्षम प्राधिकारी म्हणून एखाद्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल व अशा हद्दीमध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही जमिनीत किंवा जमिनीवर कोणत्याही व्यक्तीचे जे कोणतेही अधिकार अस्तित्वात असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल त्या अधिकारांचे अस्तित्व, स्वरूप व व्याप्ती

यासंबंधी चौकशी करून ते ठरविण्यासाठी व या अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे त्याबाबतीत कार्यवाही करण्यासाठी त्यास निदेश देण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—खंड (क) च्या प्रयोजनासाठी रस्ते, नद्या, कडे किंवा इतर सर्वज्ञात अथवा सहज लक्षात येण्याजोग्या सीमा याद्वारे त्या क्षेत्राच्या हद्दीचे वर्णन करणे पुरेसे होईल.

कलम ७ अन्वये अधिसूचित केलेल्या क्षेत्रात हक्क उपार्जित होण्यास प्रतिबंध.

८. कलम ७ अन्वये अधिसूचना प्रसिद्ध होण्याच्या आणि कलम ९, खंड (ग) खालील उद्घोषित विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकाच्या दरम्यानच्या कालावधीत, अधिसूचित केलेल्या क्षेत्रात समाविष्ट असलेल्या कोणत्याही जमिनीमध्ये किंवा जमिनीवर उत्तराधिकाराद्वारे असेल त्याव्यतिरिक्त कोणताही हक्क संपादन करता येणार नाही.

सक्षम प्राधिकाऱ्याने उद्घोषणा करणे.

९. कलम ७ अन्वये अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर, होईल तितक्या लवकर, सक्षम प्राधिकारी, त्या क्षेत्रात समाविष्ट असलेल्या जमिनीच्या जवळपासच्या प्रत्येक शहरात आणि गावात एक उद्घोषणा विहित रीतीने स्थानिक भाषेत प्रसिद्ध करील व त्या उद्घोषणेद्वारे—

(क) नियोजित राष्ट्रीय उपवनाची किंवा राज्य उपवनाची जागा व हद्दी शक्य होईल तितक्या अचूकपणे विनिर्दिष्ट करील;

(ख) राष्ट्रीय उपवनाची किंवा राज्य उपवनाची प्रस्थापना केल्यानंतर यापुढे तरतूद केल्याप्रमाणे होणारे परिणाम स्पष्ट करील;

(ग) अशा उद्घोषणेच्या दिनांकापासून तीन महिन्यांहून अगोदरचा नसेल असा दिनांक निश्चित करील आणि कलम ७ अन्वये उल्लेखिलेल्या कोणत्याही हक्कांचा दावा सांगणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला, अशा हक्काचे स्वरूप व त्याच्या संबंधात मागणी केलेली भरपाईची (कोणतीही असल्यास) रक्कम आणि तपशील विनिर्दिष्ट करणारी लेखी नोटीस अशा रीतीने निश्चित केलेल्या दिनांकास किंवा तत्पूर्वी आपल्याला सादर करण्यास किंवा आपल्यासमोर उपस्थित राहून सांगण्यास फर्मावील.

सक्षम प्राधिकाऱ्याकडून चौकशी.

१०. सक्षम प्राधिकारी, कलम ९ अन्वये करण्यात आलेली सर्व निवेदने लेखी नमूद करील आणि त्या कलमान्वये यथोचित रीत्या दाखल केलेल्या सर्व दाव्यासंबंधी आणि कलम ७ मध्ये उल्ले- खिलेल्या व कलम ९ अन्वये दावा सांगण्यात न आलेल्या कोणत्याही हक्काबद्दल सरकारी अभिलेखावरून व त्यांची माहिती असण्याचा संभव असलेल्या कोणत्याही व्यक्तीने दिलेल्या साक्षी पुराव्यावरून, जेथवर खात्री करून घेता येईल तेथवर, त्या हक्कांच्या अस्तित्वासंबंधी एखाद्या सोईस्कर जागी चौकशी करील.

सक्षम प्राधिकाऱ्याचे अधिकार.

११. सक्षम प्राधिकाऱ्यास, अशा चौकशीच्या प्रयोजनाकरिता, पुढील अधिकारांचा वापर करता येईल ; म्हणजे—

(क) त्याला स्वतःला किंवा त्या प्रयोजनासाठी त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास कोणत्याही जमिनीवर प्रवेश करण्याचा आणि तिचे सर्वेक्षण करण्याचा, सीमांकन करण्याचा व नकाशा तयार करण्याचा अधिकार;

(ख) दाव्यांची न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयाचा अधिकार.

१२. कलम ९ अन्वये ज्याच्यासंबंधी कोणताही दावा दाखल करण्यात आला नसेल आणि ज्यांच्या अस्तित्वाबद्दल कलम १० खालील चौकशीद्वारे कोणतीही माहिती मिळाली नसेल ते हक्क, कलम १४ अन्वये अधिसूचना प्रसिद्ध होण्यापूर्वी, त्यांच्याबाबत दावा सांगणाऱ्या व्यक्तीने कलम ९ अन्वये निश्चित केलेल्या दिनांकास किंवा तत्पूर्वी असा दावा दाखल न करण्यास तिला पुरेसे कारण होते अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटवून दिली नसेल तर, नष्ट होतील. हक्क नष्ट होणे.

१३. (१) कोणत्याही जमिनीतील किंवा जमिनीवरील अधिकारासंबंधी दावा असेल त्या बाबतीत, सक्षम प्राधिकारी, तो पूर्णतः किंवा अंशतः कबूल करणारा किंवा फेटाळणारा आदेश देईल. ज्या जमिनीवर हक्क सांगण्यात आला असेल ती जमीन संपादन करण्याचा अधिकार.

(२) असा दावा पूर्णतः किंवा अंशतः कबूल केला असेल तर, सक्षम प्राधिकरी, एकतर,–

(क) नियोजित राष्ट्रीय उपवन किंवा राज्य उपवन यांच्या हद्दीतून अशी जमीन वगळील ; किंवा

(ख) तिच्या मालकाने आपले हक्क सोडून देण्याबाबत त्याबरोबर करार करील; किंवा

(ग) भूमि संपादन अधिनियम, १८९४ द्वारे तरतूद केलेल्या रीतीने अशी जमीन संपादन करण्याची कार्यवाही सुरू करील.

(३) अशी जमीन अशा रीतीने संपादन करण्याच्या प्रयोजनार्थ,––

(क) सक्षम प्राधिकारी हा, भूमि संपादन अधिनियम, १८९४ अन्वये कार्यवाही करणारा जिल्हाधिकारी असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) दावाकार हा, त्या अधिनियमाचे कलम ९ अन्वये दिलेल्या नोटीशीस अनुसरून हितसंबंध असलेली आणि त्याच्यापुढे उपस्थित राहणारी व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल ;

(ग) त्या अधिनियमाच्या पूर्ववर्ती कलमांच्या तरतुदींचे पालन करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल ;

(घ) जिल्हाधिकाऱ्यास दावाकाराच्या किंवा न्यायालयाच्या संमतीने उभय पक्षकारांच्या संमतीने जमिनीच्या रूपात किंवा अंशतः जमिनीच्या रूपात आणि अंशतः पैशाच्या रूपात भरपाई देता येईल;

(ङ) एखादा सार्वजनिक मार्ग किंवा एखादे समाईक कुरण बंद केल्याच्या बाबतीत, सक्षम प्राधिकाऱ्यास, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने व्यवहार्य किंवा सोयीस्कर असेल तेथवर त्याऐवजी दुसऱ्या सार्वजनिक मार्गाची किंवा समाईक कुरणाची तरतूद करता येईल.

(४) या अधिनियमान्वये कोणत्याही जमिनीचे किंवा तिच्यावरील हितसंबंधाचे संपादन हे भूमि संपादन अधिनियम, १८९४ याच्या अर्थानुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी केलेले संपादन असल्याचे मानण्यात येईल.

१४. (१) जेव्हा पुढील घटना म्हणजेच :–– राष्ट्रीय किंवा राज्य उपवने स्थापित करण्याची अधिसूचना.

(क) कलम ९ अन्वये निश्चित केलेला दिनांक लोटेल आणि त्या कलमान्वये केलेले सर्व दावे (कोणतेही असल्यास) सक्षम प्राधिकाऱ्याकडून निकालात काढण्यात आले असतील ;

(ख) जर असे कोणतेही दावे करण्यात आले असतील अशा दाव्यांत दिलेल्या आदेशांविरुद्ध अपील करण्याचा कालावधी संपलेला असेल आणि अशा कालावधीत दाखल केलेली सर्व अपिले (कोणतीही असल्यास) निकालात काढण्यात आली असतील ; आणि

(ग) कलम १३ अन्वये, सक्षम प्राधिकाऱ्याने ज्या जमिनी, भूमि संपादन अधिनियम, १८९४ अन्वये संपादन करण्यासाठी निवडल्या असतील अशा प्रस्थापित राष्ट्रीय किंवा राज्य उपवनात समाविष्ट करावयाच्या सर्व जमिनी (कोणत्याही असल्यास), उक्त अधिनियमाच्या कलम १६ अन्वये शासनाकडे निहित झाल्या असतील,

तेव्हा, राज्य शासन, उभारलेल्या सीमाचिन्हानुसार किंवा अन्य रीतीने राष्ट्रीय किंवा राज्य उपवनांच्या हद्दी निश्चितपणे विनिर्दिष्ट करणारी अधिसूचना, **राजपत्रात** प्रसिद्ध करील आणि अधिसूचनेद्वारे निश्चित केलेल्या दिनांकापासून त्या क्षेत्राची यथास्थिति, राष्ट्रीय उपवन किंवा राज्य उपवन म्हणून, प्रस्थापना करण्यात आल्याचे जाहीर करील. ज्या नावाने ते उपवन ओळखण्यात येईल ते नावसुद्धा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल. अशा अधिसूचनेद्वारे दिनांक निश्चित करण्यापूर्वी, राज्य शासन, उपवनाच्या जवळपासच्या प्रत्येक नगरात आणि गावात, स्थानिक भाषेतील तिचा अनुवाद प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील.

(२) राज्य शासनास, तत्सम अधिसूचनेद्वारे, राष्ट्रीय उपवनाची राज्य उपवन म्हणून आणि त्याचप्रमाणे राज्य उपवनाची राष्ट्रीय उपवन म्हणून प्रस्थापना करता येईल आणि कोणत्याही उपवनाचे नाव बदलता येईल.

एखादे क्षेत्र राष्ट्रीय किंवा राज्य उपवन म्हणून राहणार नाही असे घोषित करण्याचा अधिकार.

**१५.** राज्य शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, असा निदेश देता येईल की, अशा अधिसूचनेद्वारे निश्चित करण्यात आलेल्या दिनांकापासून कोणतेही राष्ट्रीय किंवा राज्य उपवन किंवा त्यांचा कोणताही भाग, असे उपवन किंवा त्याचा भाग म्हणून राहण्याचे बंद होईल :

परंतु, अशी कोणतीही अधिसूचना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ती मसुद्याच्या स्वरूपात मांडण्यात आली नसेल आणि फेरबदलांसह किंवा फेरबदलांशिवाय, दोन्ही सभागृहांमध्ये संमत झालेल्या ठरावांद्वारे मान्य करण्यात आली नसेल तर, राज्य शासनाकडून काढण्यात येणार नाही आणि संमत झाल्यावर, उक्त अधिसूचना, दोन्ही सभागृहांकडून ज्या स्वरूपात संमत झाली असेल त्याच स्वरूपात काढण्यात येईल.

अधिनियमान्वये प्रस्थापित केलेल्या उपवनाचे नियंत्रण आणि संचालकाची कामे व कर्तव्ये.

**१६.** या अधिनियमान्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या सर्व राष्ट्रीय आणि राज्य उपवनांवर नियंत्रण ठेवणे, त्यांचे व्यवस्थापन आणि परिरक्षण यांसाठी संचालक हा प्राधिकारी असेल आणि त्या प्रयोजनासाठी, त्यास, कोणत्याही उपवनाच्या हद्दींमध्ये,––

(क) अशा उपवनाच्या प्रयोजनांकरिता त्याला आवश्यक वाटतील असे रस्ते, पूल, इमारती, कुंपणे आणि नाके बांधता येतील आणि त्याला आवश्यक वाटतील अशी इतर बांधकामे करता येतील ;

(ख) उपवनातील प्राणी जीवनाची सुरक्षितता ज्यामुळे सुनिश्चित होईल आणि उपवनाचे आणि त्यातील प्राण्यांचे ज्यामुळे नैसर्गिक अवस्थेत जतन होईल त्या उपाययोजना करता येतील ;

(ग) प्रेक्षक किंवा दुकाने किंवा इतर उपक्रम यांच्या जागेच्या सोयीसाठी, अशा जागेवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्याचे नियमन करण्यासाठी तो लादील अशा अटींस व शर्तींस अधीन राहून, इमारत उभारण्यास परवानगी देता येईल.

उपवनामध्ये प्रवेश करण्यावर किंवा तेथे निवास करण्यावर निर्बंध.

**१७.** कोणतीही व्यक्ती, आरोग्य, अध्ययन किंवा मनोरंजन या प्रयोजनांसाठी किंवा त्यास आनुषंगिक असलेल्या बाबींसाठी किंवा उपवनांमध्ये कोणताही वैध धंदा करण्यासाठी असेल त्याशिवाय आणि त्या बाबतीत केलेल्या नियमांनुसार असेल त्याव्यतिरिक्त, उपवनांत प्रवेश करणार नाही किंवा तेथे निवास करणार नाही.

१८. या अधिनियमान्वये रचना केलेल्या कोणत्याही राष्ट्रीय किंवा राज्य उपवनात, कोणतीही व्यक्ती,— राष्ट्रीय किंवा राज्य उपवनामध्ये मनाई केलेली कृत्ये.

(क) उपवनात किंवा त्याच्या आसमंतात संचालकाच्या परवानगीशिवाय कोणतेही शस्त्र, स्फोटक पदार्थ, सापळा किंवा विष नेणार नाही किंवा जवळ बाळगणार नाही ;

(ख) कोणत्याही प्राण्यास ठार मारणार नाही, त्यास इजा करणार नाही, त्यास पकडणार नाही किंवा त्यास त्रास देणार नाही किंवा कोणत्याही पक्षाचे कोणतेही अंडे किंवा घरटे हलविणार नाही किंवा ते नष्ट करणार नाही ; परंतु, मानवी जीवितास किंवा मालमत्तेस धोकादायक ठरेल अशा कोणत्याही प्राण्याची हत्या करण्याची सँचालकास परवानगी देता येईल ;

(क) संचालकाच्या परवानगीने असेल त्याशिवाय, कोणताही वन्य पशु, जिवंत किंवा मृत, किंवा त्याचा कोणताही भाग उपवनामधून नेणार नाही किंवा कोणताही प्राणी उपवनात सोडणार नाही किंवा कोणत्याही प्राण्यास तेथें जाणूनबुजून प्रवेश करू देणार नाही ;

(घ) संचालकाच्या परवानगीने असेल त्याशिवाय, उपवनामधील कोणतीही झाडे तोडणार नाही किंवा तेथून कोणतीही रोपे नेणार नाही ;

(ङ) बुद्धिपुरस्सर किंवा निष्काळजीपणाने आगीमुळे किंवा अन्य रीतीने, उपवनाची किंवा त्यातील कोणत्याही वस्तूची नुकसानी होऊ देणार नाही.

१९. (१) संचालकास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही उपवन अधिकाऱ्यास, कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाविरुद्ध एखादा अपराध केलेला आहे असे त्यास वाजवी कारणावरून वाटत असेल तर,— प्रवेश करण्याचा, झडती घेण्याचा आणि जप्ती करण्याचा अधिकार.

(क) अशा व्यक्तीची, उपवनात प्रवेश करताना किंवा प्रवेश करण्याचा प्रयत्न करताना, किंवा त्या जागेवर किंवा जागेंत असताना किंवा उपवन सोडताना झडती घेता येईल ; आणि कोणतीही जागा, वाहन, जलयान, इतर यान, यात प्रवेश करून प्रवासी सामान किंवा अशा व्यक्तींने वापरलेल्या किंवा आत आणलेल्या इतर वस्तूंची झडती घेता येईल आणि अशा झडतीच्या प्रयोजनासाठी, अशी व्यक्ती, वाहन, जलयान, प्रवासी सामान किंवा वस्तू अटकावून ठेवता येईल :

परंतु, कोणत्याही स्त्रीची स्त्रीशिवाय इतरांकडून झडती घेतली जाणार नाही व अशी झडती घेताना सभ्यतेच्या सर्व नियमांचे पालन करण्यात येईल ;

(ख) अशा व्यक्तीला सर्व आवश्यक ते प्रश्न विचारता येतील आणि अशा व्यक्तीस, त्याच्या ताब्यात असलेला कोणताही प्राणी, सापळा, शस्त्र, हत्यारे किंवा इतर वस्तू किंवा या अधिनियमान्वये तिने घेणे आवश्यक असेल असा कोणताही परवाना किंवा इतर दस्तऐवज, सादर करण्यास भाग पाडता येईल ;

(ग) या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून, वापरलेली, ठेवलेली किंवा मिळविलेली कोणतीही वस्तू किंवा दस्तऐवज किंवा इतर मालमत्ता जप्त करता येईल आणि त्यानंतर, जप्त केलेली वस्तू किंवा दस्तऐवज किंवा इतर मालमत्ता, बंधपत्र करून दिल्यानंतर किंवा अन्यथा मुक्त करण्यात आली नसेल तर, न्यायालयात ती सादर करण्यासाठी आणि ती अशा रीतीने सादर करण्यात येईतोपर्यंत तिच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी आवश्यक असेल अशी सर्व उपाययोजना करता येईल.

(२) संचालकाकडून किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडून तसे करण्यास भाग पाडण्यात येईल तेव्हा, प्रत्येक व्यक्ती, अशी झडती घेण्यास, जागा इत्यादीमध्ये प्रवेश करण्यास परवानगी देईल ; आणि स्वतःच्या संपूर्ण माहितीनुसार व विश्वासानुसार सर्व प्रश्नांची उत्तरे देईल आणि आपल्या ताब्यातील दस्तऐवज व वस्तू सादर करील.

अधिपत्राशिवाय अटक करण्याचा अधिकार.

२०. (१) संचालकास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही उपवन अधिकाऱ्यास, ज्या व्यक्तीबद्दल या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अशा कोणत्याही अपराधाशी तिचा संबंध असल्याबद्दल वाजवी संशय येत असेल आणि जिने आपले नाव व पत्ता देण्यास फर्माविले असता तसे करण्यास नकार दिला असेल किंवा जिने दिलेले नाव व पत्ता खोटा असल्याचे अधिकाऱ्यास सकारण वाटत असेल किंवा ती व्यक्ती फरारी होईल किंवा समन्स बजावून घेण्यास अन्य रीतीने टाळील असे ज्या व्यक्तीबद्दल अधिकाऱ्यास सकारण वाटेल त्या कोणत्याही व्यक्तीस, दंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय किंवा अधिपत्राशिवाय अटक करता येईल.

(२) या कलमान्वये अटक करणारा प्रत्येक अधिकारी, अटकेच्या स्थानापासून दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापर्यंतच्या प्रवासासाठी आवश्यक असलेला वेळ वगळून, अशा रीतीने अटक केल्यापासून २४ तासांच्या आत, अटक केलेल्या व्यक्तीस नजिकच्या दंडाधिकाऱ्यापुढे हजर करील.

अपराध व शास्ती.

२१. (१) जो कोणी या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा तद्अन्वये केलेला कोणताही नियम यांचे उल्लंघन करील किंवा तद्अन्वये दिलेल्या कोणत्याही परवान्याच्या किंवा परवानगीच्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करील तो, या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरेल आणि दोषसिद्ध झाल्यानंतर त्यास ६ महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या करावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) जर कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाखालील अपराधाबद्दल सिद्धदोषी ठरली तर, अपराधाची न्यायचौकशी करणाऱ्या न्यायालयास, अपराध करण्याच्या वेळी किंवा ज्याच्या संबंधात अपराध करण्यात आला असेल असा कोणताही सापळा, शस्त्र, हत्यारे, प्राणी, वाहन, जलयान, तर यान किंवा वस्तू सरकारजमा करण्याबद्दल आदेश देता येईल.

अधिनियमाखालील अपराध दखली असणे.

२२. फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ यात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील सर्व अपराध दखली असतील. १८९८ चा ५.

अपराधाची तडजोड करण्याचा अधिकार.

२३. (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, संचालकास किंवा विहित करण्यात येईल अशा दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या उपवन अधिकाऱ्यास पुढील गोष्टी करण्यास अधिकार प्रदान करता येईल :—

(क) ज्या व्यक्तीने, या अधिनियमान्वयेचा अपराध केला आहे असा वाजवी संशय येत असेल त्या व्यक्तीकडून, अपराधाची तडजोड म्हणून, दोन हजार रुपयांहून अधिक नसेल इतकी रक्कम घेणे किंवा अशा प्रकारे अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याच्या स्वेच्छेनुसार, अशी रक्कम विनिर्दिष्ट मुदतीत देण्यात येईल अशी त्या व्यक्तीनी दिलेली लेखी हमी स्वीकारणे;

(ख) कलम १९ अन्वये मालमत्ता जप्त करण्यात आली असेल तेव्हा, अशा अधिकाऱ्याने अंदाजिलेले तिचे मूल्य दिल्यानंतर किंवा अशा अधिकाऱ्याच्या स्वेच्छेनुसार, अंदाजित मूल्य विहित मुदतीत देण्यात येईल अशी संबंधित व्यक्तीकडून लेखी हमी घेतल्यानंतर, उक्त मालमत्ता मुक्त करणे.

(२) अशी रक्कम किंवा असे मूल्य किंवा या दोन्ही रकमा, अशा अधिकाऱ्यास दिल्यानंतर, किंवा यथास्थिति, अशा अधिकाऱ्याने अशी हमी स्वीकारल्यानंतर संशयित व्यक्ती अभिरक्षेत असल्यास, तिची मुक्तता करण्यात येईल आणि जप्त केलेली मालमत्ता, कोणतीही असल्यास, मुक्त करण्यात येईल, आणि अपराधाच्या संबंधात अशा व्यक्तीविरुद्ध आणखी कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही :

परंतु, अशा कोणत्याही हमी अन्वये देय असलेली कोणतीही रक्कम, ती देय होईल तेव्हा देण्यात आली नाही तर, ती जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल.

१८६० चा ४५. **२४.** या अधिनियमाखालील कोणत्याही अधिकाराचा वापर करण्यास किंवा कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यास अधिकार प्रदान करण्यात आलेले सर्व अधिकारी व सर्व व्यक्ती या, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे समजण्यात येईल. या अधिनियमान्वये अधिकार प्रदान केलेल्या व्यक्ती लोकसेवक असणे.

**२५.** या अधिनियमान्वये नेमलेला, प्राधिकृत केलेला किंवा अधिकार प्रदान केलेला कोणताही अधिकारी किंवा व्यक्ती यांच्या विरुद्ध किंवा शासनाविरुद्ध, या अधिनियमान्वये किंवा तद्अन्वये केलेल्या कोणत्याही नियमान्वये, सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या, कोणत्याही कृत्याबद्दल कोणताही दावा किंवा खटला किंवा इतर वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही. सद्‌भावनेने केलेल्या कृत्याचे संरक्षण.

**२६.** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, व पूर्वप्रसिद्धीस अधीन राहून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता नियम करता येतील. नियम.

(२) विशेषतः आणि पूर्ववर्ती अधिकारांच्या सामान्यतेस बाध न आणता, अशा नियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींची तरतूद करता येईल :–

(क) सल्लागार समितीच्या बिनसरकारी सदस्यांना कलम (४), पोट-कलम (४) अन्वये देय असलेले भत्ते;

(ख) कलम ९ अन्वये उद्‌घोषणा प्रसिद्ध करण्याची रीत;

(ग) ज्या प्रयोजनार्थ उपवनाचा वापर करता येईल ते प्रयोजन आणि ज्या शर्तीस अधीन राहून, कोणतीही व्यक्ती उपवनामध्ये प्रवेश करू शकेल किंवा तेथे निवास करू शकेल किंवा फिरू शकेल त्या शर्ती आणि ज्या मुदतीकरिता उपवन किंवा त्याचा कोणताही भाग, लोकांसाठी खुला ठेवण्यात येईल ती मुदत;

(घ) उपवनामध्ये प्रवेश करण्यासाठी, किंवा त्यात निवास करण्यासाठी किंवा कोणताही प्राणी किंवा वाहने अथवा इतर यान उपवनात नेण्यासाठी किंवा उपवनात छायाचित्रे घेण्यासाठी किंवा उपवन किंवा त्याचा इतर कोणताही भाग याचा वापर करण्यासंबंधीच्या इतर प्रयोजनासाठी किंवा, त्यामध्ये पुरविण्यात येणाऱ्या कोणत्याही सुखसोयींसाठी द्यावयाची, कोणतीही असल्यास फी;

(ङ) उपवनास भेट देणाऱ्या व्यक्तीस ज्या शर्तीस अधीन राहून, कोणत्याही उपवन अधिकाऱ्याची सेवा घेता येईल किंवा त्यास उपस्थित राहण्यास सांगता येईल त्या शर्ती, आणि अशी सेवा घेण्यासाठी किंवा त्याच्या उपस्थितीसाठी द्यावयाची, कोणतीही असल्यास फी;

(च) जेथून व्यक्तींना, प्राण्यांना, वाहनांना किंवा इतर यानांना उपवनात प्रवेश करता येईल किंवा बाहेर जाता येईल अशी ठिकाणे, ज्या मार्गाने त्यांना उपवनातून जाता येईल असे मार्ग धरून, उपवनातील प्रवाशांची जा - ये किंवा वाहतूक यांचे नियमन;

(छ) उपवनाचे परिरक्षण, नियंत्रण व व्यवस्थापन;

(ज) उपवनातील वनस्पती व प्राणी आणि मालमत्ता यांचे संरक्षण;

(झ) उपवनातील कोणतेही झाड, खडक, कुंपण, आसन, मार्ग, पूल, चिन्ह-फलक किंवा इतर वस्तू यावर लिहून किंवा अन्यप्रकारे त्या विरूप होऊ नयेत यासाठी संरक्षण;

(ञ) प्राण्यांचे संरक्षण, अपायकारक, नासधूस करणाऱ्या किंवा मोठ्या प्रमाणात पैदास झालेल्या प्राण्यांची विल्हेवाट लावणे आणि वैज्ञानिक व त्यांच्या पैदाशीच्या प्रयोजनार्थ त्यांना नेणे;

(ट) आरोग्याचे रक्षण व उपद्रव कमी करणे व त्यास प्रतिबंधक करणे;

(ठ) उपवनात कोणतेही अनधिकृत प्रदर्शन भरविणे, जाहिरात, फलक बसविणे, बांधकाम उभारणे किंवा या गोष्टी कायम ठेवण्यास प्रतिबंध करणे आणि अशी जाहिरात, फलक किंवा बांधकाम काढून टाकणे;

(ड) उपवनाचे परिरक्षण व व्यवस्थापन यासंबंधीचे संचालकाचे व उपवन अधिकाऱ्याचे जादा अधिकार व कर्तव्ये;

(ढ) ज्या परिस्थितीत आणि ज्या शर्तींना अधीन राहून, कोणत्याही अधिकाऱ्याच्या या अधिनियमाखालील अधिकार व कर्तव्ये संचालकाकडून कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याकडे किंवा कर्मचाऱ्याकडे प्रत्यायोजित करण्यात येतील ती परिस्थिती व त्या शर्ती;

(ण) या अधिनियमान्वये विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी कोणतीही बाब;

(त) राज्य शासनाच्या मते, या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठी ज्या बाबतीत तरतूद करणे इष्ट किंवा आवश्यक आहे अशी इतर कोणतीही बाब.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या अधिनियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येतील किंवा ते अंमलात येणार नाहीत, तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे, त्यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

१९५० चा मुंबई ५४. २७. (१) या अधिनियमाचा प्रारंभ झाल्यानंतर, मुंबई राष्ट्रीय उद्याने अधिनियम, १९५० व मध्य प्रदेश राष्ट्रीय उद्याने अधिनियम, १९५५ रद्द होतील. रद्द करणे व व्यावृत्ती.

१९५५ चा मध्य प्रदेश ७. (२) पोट-कलम (१) अन्वये उक्त विधि रद्द करण्यात आले असले तरीही,–

(क) रद्द केलेल्या कोणत्याही एका विधि अन्वये राष्ट्रीय उपवन म्हणून रचना केलेले किंवा घोषित केलेले कोणतेही क्षेत्र हे, या अधिनियमान्वये रचना केलेले राष्ट्रीय उपवन असल्याचे समजण्यात येईल;

(ख) अशा रीतीने रद्द केलेल्या आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या विधिपैकी कोणत्याही एका विधि अन्वये केलेली कोणतीही इतर गोष्ट किंवा कार्यवाही ही (यात कोणतीही नियुक्ती, केलेला अर्ज, काढलेली अधिसूचना, आदेश किंवा निदेश, आकारलेली फी, केलेली कार्यवाही किंवा दिलेली परवानगी यांचा समावेश होईल) या अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत असेल तेथवर, आणि राज्य शासनाने अन्यथा निदेश दिला नसेल तर, या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये केलेली, दिलेली, आकारलेली किंवा दिलेली गोष्ट किंवा कार्यवाही असल्याचे समजण्यात येईल आणि या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा कार्यवाहीद्वारे ती अधिक्रमित झाल्याशिवाय, किंवा होईतोपर्यंत, त्या त्या क्षेत्रात, त्याप्रमाणे अंमलात असण्याचे चालू राहील :

परंतु, अशा प्रकारे रद्द केलेल्या आणि या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी अंमलात असलेल्या विधिंपैकी कोणत्याही विधि अन्वये केलेला कोणताही विनियम, नियम, उप-विधि, अधिसूचना किंवा इतर लेख हा, या अधिनियमान्वये उक्त बाबतीत, यथास्थिति, केवळ नियम किंवा उप-विधि किंवा अधिसूचना अथवा इतर लेखच फक्त करणे अनुज्ञेय आहे याच केवळ कारणावरून, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत असल्याचे समजण्यात येणार नाही.

१९२७ चा १४. १९५१ चा मुंबई २४. २८. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, या अधिनियमान्वये राष्ट्रीय व राज्य उपवन म्हणून रचना केलेल्या किंवा रचना केल्याचे समजण्यात येणाऱ्या कोणत्याही क्षेत्रात, भारतीय वन अधिनियम, १९२७ किंवा मुंबई वन्य प्राणी व वन्य पक्षी संरक्षण अधिनियम, १९५१ यांच्या, प्रवर्तनावर परिणाम होणार नाही किंवा त्यावर मर्यादा पडणार नाही. इतर विवक्षित विधींच्या प्रवर्तनास प्रतिरोध नसणे.

२९. शंका दूर करण्यासाठी याद्वारे घोषित करण्यात येत आहे की, या अधिनियमातील कोणतीही गोष्ट संसदेने केलेल्या कोणत्याही विधि अन्वये किंवा तदन्वये राष्ट्रीय महत्त्वाचे म्हणून घोषित केलेल्या कोणत्याही प्राचीन व ऐतिहासिक स्मारकास किंवा पुरातत्त्वशास्त्रीय जागा किंवा अवशेष यांना लागू होणार नाही. राष्ट्रीय महत्त्वाची प्राचीन स्मारके, इत्यादींना अधिनियम लागू नसणे.

❖❖❖